


दैनिक

सत्याला वाचा फोडणारे अन्यायाच्या विरुद्ध लढणारे...

# सत्य लढा

कार्यालय - तिसरा माळा, टी - ११, दर्या हाईट्स, गांधी चौक,अकोला

DAS MOBILE Sales & Services

मोबाईलचे माहेरघर, गांधी चौक, अकोला

मुख्य संपादक- सतिश भा.देशमुख - मो.९९७०३२१८१७ » MAHMAR/2022/85691 बुधवार » दि.२१ जानेवारी २०२६ » अकोला » वर्ष :०२ » अंक : ३२१ » पाने : 4 » किंमत : 3 रुपये

## थोडक्यात

### दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसची युती होणार का?

राज्यात महापालिकेच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या. कुठे युती पहायला मिळाली तर कुठे मित्र पक्षांमध्येच धुसफूस पाहायला मिळाली. अशातच आता जिल्हा परिषद निवडणुकांच्या तोंडावर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या गटातील बड्या नेत्याने मोठं विधान केलं आहे. चिपळूणमधील राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) नामांकित आमदार शेखर निकम यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस लवकरच एकत्र येण्याबाबत महत्त्वाचे विधान केले आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र झाल्यास पक्षाची ताकद वाढेल असे त्यांनी म्हटले. पुढे ते म्हणाले,''एकत्र येण्याची प्रक्रिया चालली आहे की नाही मला माहीत नाही. मात्र निवडणुकीत आघाडी व्हावी, युती व्हावी या दृष्टीने आमचे प्रयत्न सुरू असल्याचं त्यांनी म्हटलं. येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकांबाबत बोलताना, आमदार निकम म्हणाले, गेल्यावेळी नगरपालिका निवडणुकांमध्ये चित्र वेगळं होतं. आम्ही महायुतीमधून लढण्याची भूमिका घेतली होती. काही कारणांमुळे ते घडू शकल नाही. यावेळी चिपळूणमध्ये आम्ही स्वतंत्रपणे लढावे अशी कार्यकर्त्यांची इच्छा आहे.

# शिवसेना नाव अन् चिन्हाबाबत आज सुनावणी

मुंबई ✍ दै.सत्य लढा

शिवसेनेचे नाव व धनुष्यबाण हे चिन्ह भारतीय निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे गटाला दिले आहे. त्याविरोधात उद्धव ठाकरेंनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर (२१ जानेवारी) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. त्यामुळे संपूर्ण देशाचे लक्ष या सुनावणीकडे लागले आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या फटीनंतर पक्ष आणि चिन्हाचा वाद सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. गेल्या तीन वर्षांपासून सर्वोच्च न्यायालयात याबाबत सुनावणी सुरु आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष हा एकनाथ शिंदे यांचा तर राष्ट्रवादी हा अजित पवारांचा पक्ष असल्याचा निर्णय दिला. त्यानंतर उद्धव ठाकरे आणि शरद पवारांच्या गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. गेल्या तीन वर्षांपासून सदर याचिका




सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. त्यावर उद्या सुनावणी होईल. सदर सुनावणीआधी ॲड. असिम सरोदे यांनी एक्सवर ट्विट करत महत्वाचं विधान केलं आहे.

यामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या या सुनावणीत निकाल उद्धव ठाकरेंच्या बाजूने लागल्यास शिंदेसेनेतील अनेकजण उद्धव ठाकरेंकडे स्वगृही परत जातील. तसेच उद्धव आणि राज ठाकरे मिळून मुंबई महापालिकेतील राजकारण फिरवू शकतील, असा दावाही असिम सरोदे यांनी केला आहे. असिम सरोदे काय म्हणाले? शिवसेना नाव आणि धनुष्यबाण हे पक्षचिन्ह.. सुनावणीची तारीख उद्या सुप्रीम कोर्टात आहे. पण ३७ नंबरचे मॅटर सुनावणीसाठी होणे कठीण आहे. आता लोकांचा नवीन प्रश्न- जर एकनाथ शिंदेंकडून पक्ष चिन्ह व शिवसेना नाव काढून घेतले तर मुंबई महापालिकेत काय होईल? मला वाटते शिंदेसेना भाजपमध्ये विलीन होईल व एकनाथ शिंदे यांचे राजकीय महत्व एकदम कमी होईल. शिंदेसेनेतील अनेकजण उद्धव ठाकरेंकडे स्वगृही परत जातील व मूळ शिवसेना अधिक ताकदवान होईल. उद्धव आणि राज ठाकरे मिळून मुंबई महापालिकेतील राजकारण फिरवू शकतील. सर्वोच्च न्यायालयातील एका निर्णयामुळे सुरु झालेला खेळ सर्वोच्च न्यायालयाच कधीतरी संपवेल...असं असिम सरोदे यांनी म्हटलं आहे. मागच्या सुनावणीत नेमकं काय घडलेलं? सदर प्रकरणी नोव्हेंबरमध्ये मागील सुनावणी झाली होती. त्या सुनावणीवेळीच सर्वोच्च न्यायालयाने अंतिम सुनावणीची तारीख निश्चित करत, प्रकरणाचा निकाल लवकरच दिला जाईल, असे संकेत दिले होते. त्यावेळी न्यायालयाने २१ व २२ जानेवारीला सलग दोन दिवस अंतिम युक्तिवाद ऐकून घेऊ, याव्यतिरिक्त दुसरे प्रकरण सूचिबद्ध केले जाणार नाही, असे स्पष्ट केले होते. त्यानुसार शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण निवडणूक चिन्हाबाबत सर्वोच्च न्यायालयात आज पासून अंतिम सुनावणी सुरू होणार असून, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# मोदींना गरिबांना उपाशी राहताना पहायचे आहे -राहुल गांधींची केंद्रावर टीका

दिल्ली ✍ दै.सत्य लढा

काँग्रेस खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी सध्या त्यांच्या मतदारसंघ रायबरेली येथे दोन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. या भेटीत पक्षाने आयोजित केलेल्या मनरेगा चौपालचा समावेश होता. त्यांच्या भाषणात राहुल गांधी यांनी भाजपवर जोरदार निशाणा साधला. त्यांनी रोहनिया ब्लॉकमधील उंचाहार भागात ''मनरेगा बचाओ चौपाल'' चे अध्यक्षपद भूषवले. या कार्यक्रमादरम्यान त्यांनी ग्रामस्थ आणि कामगारांशीही संवाद साधला. मोदींना गरिबांना उपाशी राहताना पहायचे आहे गर्दीला संबोधित करताना राहुल गांधी म्हणाले, ''मनरेगाच्या संकल्पनेची दोन मुख्य उद्दिष्टे होती. पहिले, सरकारी धोरणाचा भाग म्हणून ग्रामपंचायतींसारख्या स्थानिक सरकारांना काही जबाबदारी आणि आर्थिक जबाबदारी दिली पाहिजे. दुसरे, ध्येय म्हणजे गरिबांसाठी, विशेषतः तरुण पिढीसाठी किमान वेतन स्थापित करणे, जेणेकरून त्यांना फायदा होऊ शकेल. परंतु




नरेंद्र मोदींना हे नको आहे.'' त्यांना सत्ता केंद्रित करायची आहे आणि गरिबांना उपाशी राहताना पहायचे आहे. राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदींवर केली टीका लोकसभेतील विरोधी पक्षनेते काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मनरेगा कायदा रद्द केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदींवर तीव्र हल्ला चढवला आणि त्यांच्यावर गरिबांपेक्षा नोकरशहांना प्राधान्य देण्याचा आरोप केला. मनरेगा कायदा रद्द करण्याच्या मुद्द्यावर माध्यमांशी बोलताना राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर ''सत्तेचे केंद्रीकरण करण्याचा, नोकरशहांना देण्याचा आणि गरीब नागरिकांना उपाशी राहण्याचा'' प्रयत्न करण्याचा आरोप केला. त्यांनी आरोप केला की मनरेगा कायद्याचा उद्देश बेरोजगार ग्रामीण नागरिकांना आर्थिक जबाबदारी आणि किमान वेतन देणे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींना हे नको आहे; ते सत्तेचे केंद्रीकरण करू इच्छितात, नोकरशहांना देऊ इच्छितात आणि गरीब नागरिकांना उपाशी राहू इच्छितात. कायद्यात सुधारणा करून, गरिबांसाठी संरक्षण कवच काढून टाकण्यात आले आहे. म्हणूनच, काँग्रेस देशभरात मनरेगा बचाओ मोहीम राबवत आहे पंतप्रधानांना संपूर्ण देशाची अर्थव्यवस्था अंबानी आणि अदानी यांच्याकडे सोपवायची आहे, तर आपण गरिबांना मदत करण्याचा प्रयत्न करत आहोत. त्यांनी आरोप केला आहे की मनरेगा कायजद्याच्या उद्देश बेरोजदार

# भाजप पक्षाला मिळाले सर्वात तरुण अध्यक्ष; नितीन नबीन यांनी स्वीकारला पदभार

दिल्ली ✍ दै.सत्य लढा

नवी दिल्ली : भारतीय जनता पक्षाला नवीन अध्यक्ष मिळाले आहेत. भारतीय जनता पक्षाने (भाजप) त्यांच्या राष्ट्रीय अध्यक्षांच्या नावाची अधिकृत घोषणा केली आहे. नितीन नबीन यांची भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाली आहे. पक्षाच्या मुख्यालयात भाजपचे राष्ट्रीय निवडणूक अधिकारी डॉ. के. लक्ष्मण यांनी नितीन नबीन यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याची घोषणा केली. त्यानंतर पंतप्रधान मोदींनी त्यांना माळ घालून त्यांचे अभिनंदन केले. नितीन नबीन यांची भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड



झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाजपच्या नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्षांचे स्वागत केले. नितीन नबीन हे आतापर्यंत भाजपला मिळालेले सर्वात तरुण अध्यक्ष आहेत. वयाच्या ४५ व्या वर्षी नितीन नबीन यांनी भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाचा कारभार स्वीकारला आहे. वयाच्या २६ व्या वर्षी भाजपच्या युवा शाखेत सामील होण्यापासून ते आता वयाच्या ४५ व्या वर्षी भाजप अध्यक्ष होण्यापर्यंत, नितीन नबीन यांचा राजकीय प्रवास प्रेरणादायी राहिला आहे. सोमवारी राष्ट्रीय अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्यानंतर, नितीन नबीन हे पक्षाचे सर्वात तरुण अध्यक्ष ठरले आहेत. त्यांची बढती भाजपमध्ये एका पिढीतील बदल देखील दाखवून दिली आहे. नबीन हे २०२० पासून या पदावर असलेले जे.पी. नड्डा यांची जागा घेतील. कायस्थ समुदायाचे असलेले नबीन यांना यापूर्वी १४ डिसेंबर रोजी भाजपचे कार्यवाहक अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले होते.

# 'आम्हाला अनुदानाचे थकित हफ्ते मिळणार तरी कधी?' लाडक्या बहिणींची सरकारला हाक

मुंबई ✍ दै.सत्य लढा

मुंबई : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना राज्यातील महिलांसाठी चांगलीच फायद्याची ठरताना दिसत आहे. महाराष्ट्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'लाडकी बहिण' योजनेतून आता ६७ लाखांपेक्षा अधिक महिलांना वगळण्यात आले आहे. ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण न केलेल्या आणि योजनेच्या पात्रता निकषांचे उल्लंघन करणाऱ्या महिलांची ओळख पटल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. मात्र, अनेक महिलांना लाडक्या बहीण योजनेचे पैसे अद्याप आले नसल्याची परिस्थिती सध्या आहे. सरकारी आकडेवारीनुसार, राज्यातील केवळ १.८० कोटी महिलांनी ३१ डिसेंबरपर्यंत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली. २.५ लाखांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबातील महिलांसाठी सुरू केलेली लाडकी बहिण योजना पात्रता उल्लंघनाच्या प्रकरणांमध्ये अडकली आहे. यापूर्वीही अनेक अपात्र लाभार्थ्यांना काढून टाकण्यात आले आहे. त्यानंतर सरकारने ई-केवायसी अनिवार्य केले आणि सर्व लाभार्थ्यांची छाननी सुरू केली. विधानसभा निवडणुकीत 'गेमचेंजर' ठरलेली लाडकी बहीण योजना आता प्रशासनासाठी डोकेदुखी ठरताना दिसत आहे. दोन महिन्यांपासून




हफ्ते न मिळाल्याने संतप्त झालेल्या बहिणींनी थेट हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत थकीत हप्त्यांसाठी जोरदार निदर्शने केली. हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महिलांच्या लांबलचक रांगा लागल्या होत्या. आपला हप्ता खात्यात जमा झाला आहे की नाही, केवायसी पूर्ण आहे की अडचणीत आहे, याची चौकशी करण्यासाठी शेकडो महिला सकाळपासून कार्यालयात ठाण मांडून होत्या. कोणतीही पूर्वपरवानगी न घेता काढण्यात आलेल्या या मोर्चामुळे काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. त्यांनाच मिळणार नियमित लाभ ई-केवायसीची अंतिम मुदत वाढवली जाणार नाही. सर्व पात्र महिलांनी वेळेत प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन केले. मंत्र्यांच्या इशाऱ्यानंतरही असंख्य महिलांनी ही प्रक्रियाच पूर्ण केली नाही. आता, ज्या महिलांनी त्यांचे ई-केवायसी पूर्ण केले त्यांनाच नियमित लाभ मिळेल. योजनेची अखंडता आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी खऱ्या गरजू महिलांपर्यंत लाभ पोहोचतील, याची खात्री करण्यासाठी हे सरकारी पाऊल उचलल्याचे सांगण्यात येत आहे. पोर्टलवर तक्रार करूनही दखल नाहीच लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून आत्तापर्यंत अनेक महिलांना लाभ मिळाला आहे. मात्र, सध्या ई-केवायसी करूनही अनेक महिलांना अनुदानापासून वगळण्यात आले आहे. त्यात सरकारच्या अधिकृत पोर्टलवर त्यासंबंधी तक्रार करूनही कोणतीही दखल अथवा प्रतिसाद दिला जात नसल्याच्या तक्रारीही समोर आल्या आहेत. त्यामुळे महिलांना अनुदान नेमके कोणत्या कारणास्तव थांबवण्यात आले, याची माहिती मिळू शकत नाही. परिणामी, हजारो बहिणींच्या अडचणीत वाढ झाली आहे.

# राज्यात १५ लाख नोकऱ्या उपलब्ध होणार, मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा

मुंबई ✍ दै.सत्य लढा

परदेशी गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र हेच खरे गेट वे ऑफ इंडिया असल्याचे मत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. स्वित्झर्लंडच्या दावोस येथे आयोजित करण्यात आलेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीत त्यांनी हे विधान केले. महाराष्ट्र हे भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस असल्याचे देखील मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या दावोस दौऱ्याच्या पहिल्याच दिवशी १४ लाख ५० हजार कोटी गुंतवणूकींचे १९ सामंजस्य करार झाले. यावेळी गुंतवणुकीसोबतच राज्यात १५ लाख रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री उदय सामंत यांच्यासह महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाचे प्रतिनिधीमंडळ दावोस येथे गेले आहेत. दावोस दौऱ्याच्या पहिल्याच दिवसापासून जगभरातील विविध क्षेत्रातील उद्योगांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी स्वारस्य दाखवण्यास सुरुवात केली. यातून गुंतवणुकीचा मोठा ओघ सुरु झाला आहे. या दौऱ्यावेळी दावोसमधील महाराष्ट्र पॅव्हेलियनचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन झाले. तब्बल १४ लाख ५० हजार कोटींचे गुंतवणूक करार करण्यात आला. या गुंतवणूकीसोबतच राज्यात १५ लाख रोजगार संधी निर्माण होणार आहेत. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाच्या माध्यमातून यावेळी विविध विभागांनी आणि विविध क्षेत्रातील उद्योगांच्या प्रतिनिधी समवेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. हरित ऊर्जा, अन्न प्रक्रीया, पोलाद निर्मिती, आयटी-आयटीईस, डाटा सेंटर्सह ईव्ही- ऑटोमोबाईल, जहाज बांधणी, डीजिटल इन्फ्रा अशा विविध क्षेत्रातील ही गुंतवणूक मुंबईसह राज्याच्या रत्नागिरी, पालघर, गडचिरोली, अहिल्यानगर या जिल्ह्यांमध्ये पोहचणार आहे. त्यामुळे या सर्व ठिकाणी उद्योग वाढीसह मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे. या उद्घाटन कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, भविष्याचे वेध घेण्यासाठी सज्ज, विश्वासार्ह आणि दीर्घकाळचा भागीदार म्हणून महाराष्ट्र स्वागत करीत आहे. भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस म्हणून महाराष्ट्र जगाला, उद्योग विश्वाला साद घालत आहे. महाराष्ट्रावरील उद्योग क्षेत्राचा, गुंतवणूकदारांचा हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी आम्ही सदैव सज्ज आहोत. येथे होणाऱ्या करारांवरील पुढील




कार्यवाहीबाबत वॉर रूमच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येईल. उद्योजकांना आवश्यक सुविधा वेळेत आणि दर्जदार पद्धतीने मिळाव्यात याची काळजी घेतली जाईल. तसंच, 'उद्योजक गुंतवणूकदारांकडून मिळत असलेला प्रतिसाद पाहता, यंदा गतवर्षीहून अधिक गुंतवणूक आणि रोजगार संधीचे सामंजस्य करार होतील असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. विशेषतः मुंबईतील घन कचरा व्यवस्थापन, हवा आणि पाणी गुण संनियत्रणाच्या माध्यमातून सर्क्युलर ईकॉनॉमीची संरचना उभी केली जात आहे. तसेच महाराष्ट्र हे अमर्याद संधीचे राज्य आहे. त्याबाबत आणि एमएमआर क्षेत्राच्या विकासासह, तिसऱ्या मुंबईच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र आर्थिक सल्लागार समितीने आराखडा निश्चित करून दिला आहे. या माध्यमातून व्यवसायाच्या आणि चांगल्या पगाराच्या रोजगार निर्मितीवर भर दिला जात आहे., असे मुख्यमंत्री म्हणाले.




# भाजपाची कोंडी, नॉट रिचेबल चा खेळ आणि महापौरपदासाठी ३ नावांची जोरदार चर्चा

अकोला ✍ दै.सत्य लढा

अकोला महानगरपालिकेच्या निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर आता सर्वांचं लक्ष महापौरपदाच्या खुर्चीकडे लागलं आहे. कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने फोडाफोडीचे राजकारण आणि पडद्यामागील हालचालींना वेग आला आहे. त्यातच राजकीय नेत्यांच्या गाठीभेटी आणि सूचक विधानांमुळे अकोल्याच्या राजकारणात मोठा सस्पेन्स निर्माण झाला आहे.




महापौरपदासाठी मोर्चेबांधणी आणि गुप्त हालचाली अकोल्यात महापौर कोण होणार, यावरून सध्या जोरदार रस्सीखेच सुरू आहे. काही नगरसेवक नॉट रिचेबल असल्याच्या चर्चा रंगत असतानाच, भाजपचे माजी गृहराज्यमंत्री डॉ. रणजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते ॲड. फैजान मिर्झा यांनी घेतलेली भेट चर्चेचा केंद्रबिंदू ठरली आहे. ही भेट केवळ शुभेच्छा देण्यासाठी असल्याचे सांगण्यात येत असले, तरी मिर्झा यांनी लवकरच गोड बातमी कळेल असे म्हटल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. दुसरीकडे, काँग्रेस आमदार साजिद खान पठाण यांनीही जनतेला लवकरच गोड बातमी मिळेल असा दावा केल्याने महाविकास आघाडी आणि भाजपमध्ये सत्तेसाठी छुपी जुळवाजुळव सुरू असल्याचे संकेत मिळत आहेत.

# जत्रेत पाळणा अचानक कोसळला, मुलांनी जीव वाचवण्यासाठी मारल्या उड्या, १५ जण जखमी

झाबुआ ✍ दै.सत्य लढा

सोमवारी मध्य प्रदेशातील झाबुआ शहरात एका यात्रेत एक मोठा झोपाळा तुटून कोसळल्याने, मौजमजेसाठी सुरू झालेली ही सहल भीतीदायक घटनेत रूपांतरित झाली. या घटनेत एका स्थानिक सरकारी शाळेतील १३ मुलींसह १४ विद्यार्थी जखमी झाले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. जिल्हाधिकारी नेहा मीना यांनी सांगितले की, ही दुर्घटना झाबुआ येथील शासकीय स्कूल ऑफ एक्सलन्सजवळ भरलेल्या महाराज नो मेलो येथे लावलेल्या ड्रॅगन स्विंगमध्ये घडली. मिळालेल्या माहितीनुसार, झोपाळा सुरू असतानाच तो कोसळला, ज्यामुळे घटनास्थळी



मोठा गोंधळ उडाला. मिळालेल्या माहितीनुसार, जखमी मुली उत्कृष्ट विद्यालयाच्या विद्यार्थिनी आहेत. प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की, क्षमतेपेक्षा जास्त मुले बसवण्यात आल्याने हा अपघात झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि प्रशासकीय कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिस अधीक्षक डॉ. शिवदयाल सिंह, अतिरिक्त जिल्हाधिकारी भास्कर गचले, तहसीलदार यांच्यासह पोलिस आणि महसूल विभागाच्या पथकांनी परिस्थिती हाताळली आणि मदतकार्य सुरू केले. प्रशासन या घटनेची चौकशी करत आहे गेल्या सहा वर्षांपासून दिवंगत आदिवासी संत खुम सिंह महाराज यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ झाबुआ येथे ''महाराज नो मेलो'' आयोजित केला जात आहे. ही जत्रा १ ते २० जानेवारी दरम्यान चालते. या जत्रेत पाच मोठे आणि अंदाजे २५ लहान पाळणे लावण्यात आलेले आहेत. या मेळ्यात दररोज ग्रामीण आणि शहरी भागातील लोक मोठ्या संख्येने येत असतात. असे वृत्त आहे की, शहरात पूर्वी २५ डिसेंबर रोजी ख्रिसमस मेळा होता, परंतु तो बंद झाल्यानंतर आता महाराज नो मेलो आयोजित केला जात आहे. प्रशासन सध्या घटनेची चौकशी करत आहे आणि जखमींच्या स्थितीवर लक्ष ठेवून आहे.

## संपादकीय...

# ठाकरे पक्षाची ताकद टिकली

मुंबईसह महाराष्ट्रातील २९ महापालिका निवडणुका अखेर पूर्ण झाल्या आणि निकालांनी राज्याच्या राजकारणात मोठा वळण आणले आहे. विशेषतः मुंबई महापालिकेत, भाजप मोठा ठरला, तरीही शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची ताकद कायम राहिली असल्याचे स्पष्ट झाले. भावनिक मराठी मतदारांचा आधार अद्याप पक्षासाठी निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. निवडणुकीच्या निकालातून दिसले की, उद्धव ठाकरे पक्षाला मुंबईत काही जागा कमी झाल्या; तरीही त्यांच्या नेतृत्वाखालील संघटनात्मक कामगिरी आणि भावनिक मांडणीमुळे पक्ष अजूनही मराठी मतदारांच्या मनात ठसा उमठवतो. सत्तेबाहेर गेल्यानंतर उद्धव ठाकरे आणि त्यांच्या टीमने लढण्याची भूमिका घेतली आणि भविष्यातील पुनर्बांधणीच्या शक्यता उघडल्या आहेत. महापालिका निवडणुकांपूर्वी अनेक वर्षांच्या प्रशासकीय अनुभवाचा वापर करून पक्षांनी आपले स्थान मजबूत करण्याचा प्रयत्न केला. नवनिर्वाचित नगरसेवक आता आापापल्या शहरातील सेवा, स्वच्छता, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, आणि विकासकामे हाती घेणार आहेत. ही प्रक्रिया पाच वर्षे चालेल आणि त्यानंतर पुन्हा निवडणूक होईल, परंतु निवडणुकीत यशस्वी होण्यासाठी नगरसेवकांनी जनतेच्या अपेक्षांची खरी काळजी घेणे आवश्यक आहे. मुंबईतल्या निकालावर नजर टाकली तर ठाकरे बँडच्या २० जागा कमी झाल्या आहेत. उद्धव ठाकरे यांनी नाराज भाऊ राज ठाकरे यांना समवेत घेऊन पक्षात एकजूट दाखवली. त्यामुळे बाळासाहेब ठाकरे यांची विचारसरणी मानणाऱ्या मुंबईकरांना समाधान मिळाले. एकत्रित कुटुंबाची प्रतिमा, मराठीभावनिकता, आणि नेत्यांच्या सहकार्यामुळे नागरिकांची मते पक्षासाठी स्थिर राहिली. मुंबईच्या मराठीबहुल भागात अनेक जण अजूनही ठाकरे पक्षाला पसंती देतात. एकनाथ शिंदे पक्षाने ब्रँडिंग आणि नेतृत्वाद्वारे आपले वर्चस्व राखले, विशेषतः बृहन्मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली भागात विजय मिळवला. भाजपने याच भागात मोठे आव्हान दिले, मात्र नगरसेवकांच्या संख्येमध्ये दोन्ही पक्षांचे बदलते प्रमाण हे लढाईचे प्रमाण दर्शवते. मुंबईत मराठीबहुल भागात उद्धव ठाकरे पक्षाने विरोधकांवर प्रभावी मात केली, तर नवनिर्वाचित नगरसेवक आता प्रशासनाचे काम सुरू करणार आहेत. भाजपने मुंबईत क्रमांक एक राखला आणि सर्वाधिक नगरसेवक निवडून आणले, परंतु शहरातील संपूर्ण नियंत्रण मिळवण्यासाठी आवश्यक असलेली स्थिरता त्यांना अजून मिळाली नाही. प्रशासनात वर्चस्व राखण्यासाठी आता पक्षाला कार्यक्षम नेतृत्व आणि नियोजनाची गरज आहे. परभणी, नाशिक, नागपूर, भिवंडी, मालेगावसारख्या इतर महापालिकांमध्येही निकाल वेगवेगळे लागले. येथे स्थानिक राजकारणातील विविध पक्षांचे सामर्थ्य स्पष्ट झाले. अल्पसंख्याकांचे राजकारणही आता नवीन मुद्दा म्हणून उदयास आले आहे. खास करून ऑल इंडिया मजलिस ए इत्तिहादुल मुसलमीन (एमआयएम) पक्षाने काही महापालिकांमध्ये आपले स्थान मजबूत केले आहे, ज्यामुळे भविष्यातील विस्तारासाठी नव्या रणनीतीची आवश्यकता निर्माण झाली आहे. शिवसेना उद्धव ठाकरे पक्षासाठी हे निकाल काही प्रमाणात आव्हानात्मक असले तरी त्यांनी आपली ताकद टिकवली आहे. खास करून आदित्य ठाकरे यांनी मुंबईत स्थानिक प्रचारावर लक्ष केंद्रित केले. बाहेरील भागांमध्ये त्यांचा सहभाग कमी होता; तरीही मुंबईमध्ये मराठी मतदारांच्या भावनिक आधारामुळे पक्षाची ताकद कायम राहिली. हे दाखवते की, स्थानिक नेतृत्व, व्यक्तिमत्त्व, आणि भावनिक संपर्क राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावतात. राजकीय विश्लेषकांचे मत आहे की, उद्धव ठाकरे पक्षाने भविष्यातील विकास आणि जनसेवा योजनांकडे लक्ष केंद्रित केले तर मराठीभावनिकतेचा उपयोग करून पक्ष दीर्घकालीन स्थिरता राखू शकेल. दुसरीकडे, विरोधकांमध्ये भाजप, मनसे (राज ठाकरे) आणि इतर पक्षांनी आापापले स्थान मजबुतीसाठी कार्यवाही सुरू केली आहे. सध्याच्या परिस्थितीत महापालिकांतील कामकाजासाठी निवडून आलेले नगरसेवक, वर्चस्व, आणि राजकीय धोरणांचा वापर करणार आहेत. जनतेने दिलेल्या मते स्वीकारून विकासकामांवर लक्ष देणे, वादविवाद टाळणे, आणि पक्षांच्या आंतरिक सामर्थ्यावर अवलंबून राहणे हे महत्त्वाचे ठरणार आहे. यंदाच्या निकालातून स्पष्ट झाले की, मुंबईत उद्धव ठाकरे पक्षाने भावनिक आधार टिकवला, परंतु जागांमध्ये घट झाली. भाजपने बहुमत मिळवण्याचा प्रयत्न केला, परंतु शहरातील मराठीबहुल भागात त्यांच्या यशाचा परिणाम सीमित राहिला. स्थानिक नेतृत्व, प्रचारशैली, आणि नागरिकांशी संपर्क यावरून पक्षांचे भविष्यातील धोरण ठरेल. सारांशतः, महाराष्ट्रातील महापालिका निवडणुका राजकीय समीकरण बदलणाऱ्या ठरल्या आहेत. उद्धव ठाकरे पक्षाची ताकद टिकली असून, भावनिक मराठी मतदारांचा आधार कायम आहे. भाजप आणि शिंदे गटाने आपले वर्चस्व राखले, तर अल्पसंख्याक पक्षांनी नवीन प्रदेशीय जागा मिळवल्या. आता महापालिकांच्या कामकाजावर लक्ष केंद्रित होईल, जनसेवा, विकास, आणि राजकीय पुनर्बांधणी या तीन मुद्द्यांवर पुढील पाच वर्षे राजकारण उभे राहील.

# ‘डेटा लीक’चा भयकंप

सोशल मीडिया क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी असणाऱ्या ‘इन्स्टाग्राम’च्या दीड कोटींहून अधिक वापरकर्त्यांच्या माहिती सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून सायबर विश्वात यामुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. वापरकर्त्यांचा वैयक्तिक डेटा धोक्यात असल्याचा दावा केला जात आहे. यामध्ये वापरकर्त्यांची नावे, भ्रमणध्वनी क्रमांक, घराचे पत्ते आणि ई-मेल आयडी यांचा समावेश आहे. आजच्या काळात इन्स्टाग्राम हे सोशल मीडिया वापरकर्त्यांच्या सर्वाधिक पसंतीचे ठरलेले माध्यम म्हणून पुढे आले आहे. विशेषतः ‘टिकटॉक’वर बंदी घातल्यानंतर इन्स्टाने रिल्स नामक संकल्पना अचूक वेळी पुढे आणली आणि तिथून पुढे ‘इन्स्टाग्राम’चा अक्षरशः झंझावात सुरू झाला. वैयक्तिक माहिती शेअर करण्यापासून ते विविध ब्लॉगपर्यंत सर्वदूर इन्स्टाग्राम वापरले जाऊ लागले; पण अलीकडे इन्स्टाग्राम वापरकर्त्यांच्या इनबॉक्समध्ये अचानक पासवर्ड रिसेट ई-मेल्सचा पूर येऊ लागल्याचे दिसून आले. कोणतीही मागणी न करता आलेले हे ई-मेल्स अनेकांना गोंधळात टाकणारे ठरले. खोलात जाऊन माहिती घेतल्यानंतर याच्या मुळाशी सायबर सुरक्षेच्या दृष्टीने एक महत्त्वाची आणि चिंताजनक घडामोड असल्याचे समोर आले. त्याच वेळी डार्क वेबवरील एका मंचावर सुमारे १७.५ दशलक्ष इन्स्टाग्राम खात्यांची माहिती उपलब्ध झाल्याच्या बातम्यांनी वापरकर्त्यांच्या अस्वस्थतेत भर घातली. सद्यस्थितीत दोन अब्जहून अधिक मासिक सक्रिय वापरकर्ते असलेले इन्स्टाग्राम हे सायबर गुन्हेगारांचे प्रमुख लक्ष्य असणे स्वाभाविक आहे. वापरकर्त्यांचे खाते ताब्यात घेण्यासाठी ब्राऊझर एक्स्टेन्शनपासून ते फिशिंग मोहिमांपर्यंत अनेक क्लृप्त्या वापरल्या जातात; मात्र अलीकडे दिसून आलेली पद्धत तुलनेने अधिक सोपी आणि मानसशास्त्रीय दबाव निर्माण करणारी आहे. थेट इन्स्टाग्रामकडून आलेला खरा पासवर्ड रिसेट करण्याबाबतचा ई-मेल वापरकर्त्याला गोंधळात टाकणारा ठरला. असा ई-मेल मिळाल्यावर साहजिकच ‘माझे खाते धोक्यात आहे’ अशी भावना निर्माण होते आणि घाईघाईने निर्णय घेण्याची शक्यता वाढते. हाच क्षण हल्लेखोरांसाठी महत्त्वाचा ठरतो. ‘डेटा लीक’चा इतिहास ‘याहू’ची डेटा गळती ही सायबर इतिहासातील सर्वात मोठ्या डेटा गळतींपैकी एक घटना मानली जाते. २०१३ आणि २०१४ मध्ये दोन वेगवेगळ्या सायबर हल्ल्यांमध्ये ‘याहू’च्या सुमारे ३ अब्ज वापरकर्त्यांची खाती बाधित झाली. वापरकर्त्यांची नावे, ई-मेल पत्ते, फोन क्रमांक, जन्मतारीख आणि एन्क्रिप्टेड पासवर्ड बाहेर गेले. ही बाब २०१६ मध्ये उघडकीस आली होती आणि या गळतीमुळे ‘याहू’च्या व्हेरिझॉनसोबतच्या विक्री कराराच्या किमतीत कपात झाली. त्यापूर्वी २०१३ मध्ये अ‍ॅडोबीच्या सॉफ्टवेअर प्रणालीत झालेल्या हल्ल्यात १५ कोटी वापरकर्त्यांची माहिती चोरीला गेली. यात ई-मेल पत्ते, एन्क्रिप्टेड पासवर्डस आणि क्रेडिट कार्ड माहितीचा समावेश होता. विशेष बाब म्हणजे, अनेक पासवर्ड्स कमकुवत पद्धतीने एन्क्रिप्ट केलेले असल्यामुळे ते सहज उलगडले गेले. ‘इक्विफॅक्स’ या अमेरिकेतील क्रेडिट रेटिंग कंपनीमध्ये झालेल्या डेटा लीक प्रकरणात १४.७ कोटी नागरिकांची अत्यंत संवेदनशील माहिती बाहेर पडली. सामाजिक सुरक्षा क्रमांक, जन्मतारीख, पत्ते आणि ड्रायव्हिंग लायसन्स तपशील ठकसेनांच्या हाती लागल्याने ही घटना आर्थिक आणि कायदेशीर दृष्ट्या अत्यंत गंभीर ठरली. परिणामी, कंपनीला अब्जावधी डॉलर्सची नुकसानभरपाई आणि दंड भरावा लागला. २०१८ मध्ये घडलेले फेसबुककेंब्रिज अ‍ॅनालिटिका प्रकरण अद्यापही चर्चिले जाते. कारण, यामध्ये तब्बल ८.७ कोटी फेसबुक वापरकर्त्यांचा डेटा परवानगीशिवाय राजकीय उद्देशांसाठी वापरण्यात आला. एका तृतीय पक्ष अ‍ॅपद्वारे डेटा गोळा करून तो केंब्रिज अ‍ॅनालिटिका या राजकीय सल्लागार संस्थेला देण्यात आला. या प्रकरणामुळे फ सबुकवर जागतिक स्तरावर विश्वासाचा मोठा तडा गेला आणि डेटा गोपनियतेवर गंभीर चर्चा सुरू झाली. २०१८ मध्ये मॅरियट समूहाच्या स्टारवूड हॉटेल सिस्टीममध्ये दीर्घकाळ सुरू असलेल्या घुसखोरीमुळे ५० कोटी ग्राहकांची माहिती गळतीला लागली होती. यात पासपोर्ट क्रमांक, प्रवास तपशील, संपर्क माहिती आणि काही प्रकरणांत क्रेडिट कार्ड डेटा समाविष्ट होता. ही घुसखोरी अनेक वर्षे लक्षात न येणे, ही बाब अधिक धक्कादायक ठरली. २०२२ मध्ये ट्विटरच्या एपीआयमधील त्रुटीचा वापर करून हॅकर्सनी ५.४ कोटी खात्यांचे ई-मेल आणि फोन नंबर गोळा केले होते. ही माहिती नंतर डार्क वेबवर विक्रीसाठी ठेवण्यात आली. ही घटना थेट हॅकिंग न करता प्रणालीतील कमकुवत दुव्याचा वापर कसा केला जातो, याचे उदाहरण मानली जाते. २०२३ मध्ये ‘मूव्हइट’ या फाईल ट्रान्स्फर सॉफ्टवेअरमधील त्रुटींचा फायदा घेऊन क्लॉप रॅन्समवेअर गटाने शेकडो संस्थांचा डेटा चोरला. सरकारी विभाग, बँका, आरोग्य संस्था आणि विद्यापीठे यांचा यात समावेश होता. ‘इन्स्टाग्राम’बाबत नेमके काय घडले? जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात अनेक वापरकर्त्यांना एका पाठोपाठ एक पासवर्ड रिसेट ई-मेल्स मिळाले. हे ई-मेल्स बनावट नव्हते, तर इन्स्टाग्रामच्या अधिकृत प्रणालीतूनच पाठवले गेले होते. त्यामुळे पारंपरिक फिशिंगप्रमाणे लिंक खोटी आहे का, ई-मेल अ‍ॅड्रेस संशयास्पद आहे का, अशी शंका निर्माण होण्यास वावच नव्हता. ई-मेलमधील मजकूर मात्र स्पष्टपणे सांगतो की, तुम्ही ही रिक्वेस्ट केली नसेल, तर पासवर्ड बदलला जाणार नाही. साहजिकच, हे वाचल्यानंतर घाबरलेला वापरकर्ता अनेकदा विचार न करता ‘रिसेट’ पर्यायावर क्लिक करतो. याच मानसिकतेवर हल्लेखोर अवलंबून असतात. या




पार्श्वभूमीवर डार्क वेबवरील ‘ब्रिचफोरम्स’ या मंचावर १७.५ दशलक्ष खात्यांचा डेटाबेस उपलब्ध झाल्याची माहिती समोर आली. या डेटामध्ये वापरकर्त्यांची नावे, ई-मेल पत्ते, फोन क्रमांक आणि यूजर आयडी समाविष्ट असल्याचे सांगितले गेले. या घटनेचा आणि पासवर्ड रिसेट ई-मेल्सच्या लाटेचा थेट संबंध आहे का, हा प्रश्न उपस्थित झाला. मेटाने मात्र आपल्या प्रणालीत कोणतीही घुसखोरी झालेली नाही, असे स्पष्ट केले. कंपनीच्या अधिकृत निवेदनानुसार, एका त्रुटीमुळे बाहेरील व्यक्तींना पासवर्ड रिसेट ई-मेल्स ट्रिगर करता येत होते. ही त्रुटी दुरुस्त करण्यात आली असून वापरकर्त्यांची खाती सुरक्षित आहेत, असे सांगितले गेले; परंतु हे स्पष्टीकरण अनेकांना अपुरे वाटले. कारण, प्रणालीत घुसखोरी झालेली नाही आणि वापरकर्त्यांची माहिती बाहेर आहे या दोन गोष्टी वेगळ्या आहेत. तसेच हा डेटाबेस नवीन नसून २०२२ मध्ये एपीआयमधील त्रुटींतून गोळा झालेल्या जुन्या माहितीतून तयार झालेला आहे. ही माहिती २०२४ मध्ये सायबर गुन्हेगारी गटांमध्ये फिरत होती; मात्र आता ती सार्वजनिकरीत्या उपलब्ध झाल्यामुळे तिचा गैरवापर मोठ्या प्रमाणावर होऊ शकतो. जुनी माहिती असली, तरी तिचा वापर करून मोठ्या प्रमाणावर पासवर्ड रिसेट रिक्वेस्ट्स पाठवणे शक्य झाले, हे या घटनेतून स्पष्ट होते. सायबर सुरक्षातज्ज्ञांच्या मते, हा हल्ला प्रत्यक्ष खाते फोडण्यापेक्षा वापरकर्त्यांच्या विश्वासावर आघात करणारा आहे. सतत ई-मेल्स येऊ लागल्यावर लोक घाबरतात आणि सावधगिरीची भावनाही कमी होते. यालाच ‘रिसेट फटिग’ असे म्हटले जाते. खऱ्या आणि बनावट इशाऱ्यांमधील फरक ओळखण्याची क्षमता कमी होते. अशावेळी एखादी चुकीची कृती झाली, तर हल्लेखोरांना संधी मिळू शकते. इन्स्टाग्रामची प्रमाणीकरण व्यवस्था (ऑथेंटिकेशन सिस्टीम) इतर मेटा प्लॅटफॉर्म्सशी जोडलेली असल्याने धोका अधिक वाढतो. एकाच खात्याद्वारे फेसबुक, इन्स्टाग्राम आणि थ्रेड्समध्ये प्रवेश मिळतो. त्यामुळे एका ठिकाणी कमकुवत दुवा आढळला, तर तिचा परिणाम अनेक सेवांवर होऊ शकतो. ही गुंतागुंतच हल्लेखोरांसाठी संधी निर्माण करते. या सगळ्या गोंधळात वापरकर्त्यांनी नेमके काय करावे, हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. सर्वप्रथम कोणताही अनपेक्षित पासवर्ड रिसेट ई-मेल मिळाल्यास घाई करू नये. ई-मेलमधील लिंकवर क्लिक करण्याऐवजी थेट अ‍ॅप किंवा अधिकृत वेबसाईटवर जाऊन खाते सुरक्षित आहे का, हे तपासणे अधिक शहाणपणाचे ठरते. दुसरे म्हणजे प्रत्येक प्लॅटफॉर्मसाठी वेगळा आणि मजबूत पासवर्ड वापरणे आवश्यक आहे. यामुळे एका ठिकाणची माहिती लीक झाली, तरी इतर खाती सुरक्षित राहतात. तिसरे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे टू स्टेप ऑथेंटिकेशन सुरू ठेवणे. ओळख न झालेल्या उपकरणावरून लॉगिनचा प्रयत्न झाला, तर अतिरिक्त कोडची गरज भासते आणि यामुळे हल्लेखोरांचा मार्ग अडतो. इन्स्टाग्रामने काही प्रकारच्या खात्यांसाठी हे प्रमाणीकरण आपोआप सुरू केले आहे; मात्र अनेक सामान्य वापरकर्ते ते बंद करतात किंवा दुर्लक्ष करतात. सध्याच्या परिस्थितीत ही चूक महागात पडू शकते. खाते आधीच ताब्यात गेले असल्यास इन्स्टाग्रामकडून दिलेल्या अधिकृत प्रक्रियेद्वारे ते परत मिळवण्याचा प्रयत्न करावा. ही घटना केवळ इन्स्टाग्रामपुरती मर्यादित नाही. ती आजच्या डिजिटल युगातील एक व्यापक वास्तव दाखवणारी आहे. सायबर गुन्हेगार थेट प्रणाली फोडण्याऐवजी कायदेशीर आणि वैध प्रक्रियांचा गैरवापर करून गोंधळ निर्माण करत आहेत. त्यामुळे कंपन्यांना केवळ अंतर्गत सुरक्षा नव्हे, तर वापरकर्त्यांचा अनुभव आणि त्यांच्यापर्यंत पोहोचणारे संकेत यांचाही गंभीरपणे विचार करावा लागणार आहे. डिजिटल सुरक्षितता ही एकदाच करून संपणारी गोष्ट नाही, तर सतत जागरूक राहण्याची प्रक्रिया आहे. घाई, भीती आणि गोंधळ यावर नियंत्रण ठेवले, तर अशा हल्ल्यांचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर कमी करता येऊ शकतो. मेटाचा डेटा सिक्युरिटीचा इतिहास पाहता संशय कायम राहणे स्वाभाविक आहे. सप्टेंबर २०२४ मध्ये सुमारे ६० कोटी फेसबुक आणि इंस्टाग्राम पासवर्ड्स साध्या मजकुरात साठवले गेल्याचा प्रकार उघडकीस आला होता. ही पद्धत २०१२ पासून सुरू असल्याचे समोर आल्यानंतर मेटाला तब्बल १०१ दशलक्ष डॉलर्सचा दंड भरावा लागला होता. या पार्श्वभूमीमुळे ‘यावेळी खरोखरच काहीच घडले नाही का’ असा प्रश्न अनेकांच्या मनात आहे. हे प्रकरण केवळ तांत्रिक नसून मानसशास्त्रीयही आहे. पासवर्ड रिसेटसारख्या सूचनांचा मारा झाला की, वापरकर्ते गोंधळतात. परिणामी, एखादी खरी सूचना आली, तरी तिच्याकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता वाढते. अशी स्थिती सायबर गुन्हेगारांसाठी अनुकूल ठरू शकते. म्हणूनच थेट हॅकिंगपेक्षा वापरकर्त्यांच्या वर्तनावर परिणाम करणाऱ्या पद्धती अधिक वापरल्या जात असल्याचे दिसते.

## मुर्तिजापुरमध्ये राष्ट्रीय युवा सप्ताह व स्व.खाशाबा जाधव जयंती उत्साहात संपन्न

मुर्तिजापूर ✍ दै.सत्य लढा

मेरा युवा भारत केंद्र,अकोला युवा कार्यक्रम एव खेल मंत्रालय भारत सरकारच्या वतीने स्वामी विवेकानंद जयंती तथा राष्ट्रीय युवा सप्ताह स्व.खाशाबा दादासाहेक जाधव याच्या जयंती निमित्त नेहरू युवा बहुउद्देशीय क्रीडा व सांस्कृतिक मंडळ कोकणवाडी मेरा युवा भारत तालुका समन्वयक विलास वानखडे यांनी रीतसर माहिती दिली. स्वामी विवेकानंदांच्या स्वप्नातला युवक असावा असा विचाराचा प्रसार व प्रचार पत्रका मधून शहरात युवकांना देण्यात आले कारण आजचा युवक वेगवेगळ्या तऱ्हेने वळत आहे.मोबाईलचे व्यसन डिप्रेशन अशा अनेक प्रकारच्या वेगळ्या दिशेने जात आहे.करिता स्वामी विवेकानंद च्या विचार प्रत्येकाने मनात अंगीकारा वा असे चांगले



गुणधर्म आत्मसात करणे हाच एक उद्देश आहे तसेच स्व.खाशाबा दादासाहेब जाधव यांच्या विषयी पण माहिती विशद करण्यात आली खाशाबा जाधव यांचा जन्म १५ जानेवारी १९२५ ला झाला त्याचे मुळ गाव सातारा जिल्ह्यातील गोळेश्वर ,कराड येथील रहिवासी होते त्यांनी ऑलिंपिक क्रीडा स्पर्धा मध्ये हेलसिकी येथे १९ ५२ मध्ये पहिले वैयक्तिक कुस्तीमध्ये पदक जिंकून क्रीडा क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी केली व आपल्या राज्याचे नाव लौकीक केले त्यामुळे त्यांच्या जयंतीदिनी राज्य क्रीडा दिन तथा त्याची जयंती क्रिडा प्रेमींसह सर्वांनी साजरी करावी असे मत व्यक्त करण्यात आले.विविध क्षेत्रांमध्ये काम करणारे क्रीडा शिक्षक ज्ञानेश टाले,तालुका क्रीडा कार्यालयाचे विनोद काळबांडे,सर्पमित्र मुन्ना श्रीवास,मेजर फिटनेस ॲकडमीचे मंगेश तेलमोरे,जी. के ॲकडमीचे रवी गोंडकर,फौजी फिटनेस ॲकडमीचे मंगेश घुगे,सिटी टायकोंडोचे दिनेश श्रीवास,सामाजिक कार्यकर्ते गजानन चव्हाण,अक्षय वानखडे सह युवा युतीस सन्मानित करून युवा सप्ताहाची सांगता करण्यात आली.

## नवनिर्मितीच सामर्थ्य असलेल्या मनुताई कन्या शाळेतील माता पालकांनी घेतले वैचारिक वाण

मुर्तिजापूर ✍ दै.सत्य लढा

तिळगुळ समारंभ हा केवळ धार्मिक रुढी नसून वैचारिक देवाण-घेवांणचा सण होय आणि हीच वैचारिक देवाणघेवाण साधण्याकरिता मनुताई कन्या शाळेच्या सभागृहामध्ये विद्याभारती तर्फे आयोजित सप्तशक्ती संगम तसेच हळदी कुंकू या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

स्त्री ही कुटुंबाचा कणा आहे. आणि त्यामुळेच कुटुंब व्यवस्थेचा ती आधारस्तंभ आहे. तेव्हा स्त्रियांमध्ये उपजतच असलेल्या आंतरिक शक्तींना उजाळा देण्यासाठी सप्तशक्ती संगम या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला अध्यक्षा म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका आदरणीय सौ ऐश्वर्या ताई धारस्कर ह्या होत्या तर प्रमुख पाहुण्या म्हणून जिजाऊ कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका आदरणीय श्रीमती मेधा देशपांडे व






आर डी ची पब्लिक स्कूल येथील शिक्षिका आदरणीय सौ संघमित्रा चंदनखेडे ह्या होत्या. यावेळी प्रमुख अतिथी यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात ही दीप प्रज्वलन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या आदरणीय श्रीमती मेधा देशपांडे यांनी यावेळी आपली पहिली शाळा म्हणजे कुटुंब होय आणि कुटुंबामधूनच मुलांवर छोटे छोटे संस्कार घडत असतात की ज्यामधून सुसंस्कारित नागरिक व त्यातून सशक्त समाज निर्माण होत असतो अशा प्रकारचे वैचारिक वाण उपस्थित माता पालकांना देत कुटुंब प्रबोधन या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले तसेच आदरणीय सौ संघमित्रा चंदनखेडे यांनी पर्यावरणाचा मानवी जीवनाशी कसा सहसंबंध आहे हे पटवून देत सण उत्सव साजरे करण्यामागील वैज्ञानिक दृष्टिकोन याबाबतचा उलगडा करत उपस्थितांना मार्गदर्शन केले.तसेच काही माता पालकांनी वेगवेगळ्या ऐतिहासिक स्त्रियांच्या भूमिका साकारत उपस्थितांची मने जिंकली. याचबरोबर प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आपल्या कुटुंबासाठी प्रेरणा ठरणाऱ्या विशिष्ट माता पालकांचा सुद्धा यावेळी सन्मान करण्यात आला. तसेच काही माता पालकांनी वैचारिक देवाण-घेवाण करत कार्यक्रमाविषयीचे आपले मनोगत व्यक्त केली.

# प्रशिक्षित रासेयो स्वयंसेवक आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यात सक्षम ठरतील - कमांडंट सारंग कुर्वे

अकोला ✍ दै.सत्य लढा



जागतिक हवामान बदलाच्या या कालखंडात संपूर्ण जगचं एक प्रकारे बेमौसमी पाऊस, महापूर, वादळ, दुष्काळ, गारपीट अश्या अनैसर्गिक आव्हानांना तोंड देतांना दिसत असून प्रचंड लोकसंख्यांक आपल्या देशात पर्यायी आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणा उभारणे काळाची गरज असल्याचे सांगत राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एनडीआरएफ) पुणे येथील प्रमुख कमांडंट सारंग कुर्वे यांनी महाराष्ट्र राज्याच्या सन्माननीय राजभवन कार्यालयाचे ऋण व्यक्त करताना महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठातील विद्यार्थ्यांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाबाबत जागरूकता निर्माण होण्यासोबतच कौशल्य व नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी तसेच अचानक घडणाऱ्या नैसर्गिक अथवा मानवनिर्मित घटनांमुळे होणारी जीवितहानी, मालमत्तेचे नुकसान व सामाजिक अव्यवस्था टाळण्यासाठी ''आव्हान- चान्सलर्स ब्रिगेड'' या महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ आपत्ती पूर्वतयारी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये करीत विद्यार्थ्यांमध्ये आपत्कालीन परिस्थितीत पूर्वतयारी,शिस्त, समन्वय आणि तत्पर सेवाभाव वृद्धिंगत करण्याचा अतिशय महत्वाकांक्षी उपक्रम हाती घेतल्याचे गौरवोद्गार काढले. अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या मुख्यालयी आयोजित ''महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ आपत्तीपूर्व तयारी प्रशिक्षण शिबिराचे'' चवथ्या दिवशी पूरसदृश्य परिस्थितीत जीवितहानी टाळण्यासाठी आपत्कालीन नियोजन या कृतियुक्त प्रशिक्षण शिबिरात उपस्थित राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे विशेष उपस्थितीत विद्यापीठाच्या बाभुळगाव विभागातील संग्राहक तलावावर संपन्न झालेल्या या प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रसंगी एनडीआरएफच्या जवानांनी उपस्थित स्वयंसेवकांना प्रत्यक्ष पाण्यात उतरून आपत्कालीन परिस्थितीत मनुष्य हानी टाळण्याच्या विविध उपायोजना सहजतेने समजून सांगितल्या. भल्या पहाटे सकाळी सात वाजता चहा नाश्ता घेऊन सुमारे १५०० विद्यार्थी विद्यार्थिनी दोन गटात तलावाकडे रवाना झाले.

तेथे एनडीआरएफ टीमने अगोदरच संपूर्ण प्रशिक्षणाची पूर्वतयारी करून ठेवली होती. विद्यार्थ्यांच्या प्रचंड उत्साहात संपूर्ण दिवसभर एनडीआरएफ जवानांनी कृतीयुक्त प्रशिक्षणाचे धडे गिरविले. विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. संदीप हाडोळे आणि विद्यार्थी कल्याण कार्यालयाच्या सर्व अधिकारी कर्मचारी वर्गाने आपल्या अथक परिश्रमातून शिबिराचा चौथा दिवसही अतिशय यशस्वी केल्याची भावना होती.

# पिंपळखुटा ग्रामस्थ आक्रमक; ग्रामसेवक बदलीला तीव्र विरोध ठिय्या आंदोलनाचा इशारा

अमरावती ✍ दै.सत्य लढा



धामणगांव रेल्वे धामणगांव रेल्वे तालुक्यातील पिंपळखुटा ग्रामपंचायतीत कार्यरत असलेल्या कर्तव्यदक्ष ग्रामसेवक कु. पल्लवी रंगारी यांची बदली करू नये, या मागणीसाठी पिंपळखुटा गावातील ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. प्रशासनाने ग्रामस्थांच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्यास लोकशाही मार्गाने ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. दिनांक १० ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या ग्रामसभेत सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व सर्व ग्रामस्थांच्या उपस्थितीत एकमताने ठराव मंजूर करून कु. पल्लवी रंगारी यांनाच पिंपळखुटा ग्रामपंचायतीत कायम ठेवण्याची मागणी करण्यात आली होती. हा ठराव दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी पंचायत समिती कार्यालयात अधिकृतरीत्या सादर करण्यात आला आहे. विकासकामांना गती, ग्रामस्थ समाधानी कु. पल्लवी रंगारी यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर अनेक वर्षांपासून रखडलेली विकासकामे मार्गी लावली. विविध शासकीय योजना प्रभावीपणे राबवत दाखले, नोंदी, कर वसुली, स्वच्छता तसेच प्रशासकीय कामे वेळेत, पारदर्शक व शिस्तबद्ध पद्धतीने पूर्ण केली. त्यांच्या कार्यशैलीमुळे ग्रामस्थांना कोणताही त्रास न होता कामे होत असून गावाचा सर्वांगीण विकास वेगाने सुरू असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. प्रशासक म्हणूनही नियुक्तीची मागणी सध्या ग्रामपंचायतीत प्रशासक काळ सुरू असताना कु. पल्लवी रंगारी यांचीच प्रशासक म्हणून नियुक्ती करावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. ग्रामसेवक व ग्रामस्थ यांच्या समन्वयातून पिंपळखुटा ग्रामपंचायत आदर्श ग्रामपंचायतीच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले. मागणी न मानल्यास आंदोलन अटळ ग्रामस्थांच्या भावना, ग्रामसभेचा ठराव आणि गावाच्या विकासाकडे दुर्लक्ष केल्यास पंचायत समिती कार्यालय, जिल्हा परिषद अमरावती तसेच जिल्हाधिकारी कार्यालय येथे ठिय्या आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. सध्या या प्रकरणात गटविकास अधिकारी कोणता निर्णय घेतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून प्रशासन ग्रामस्थांच्या बाजूने उभे राहते की नाही, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# सेवाकार्यातील आशीर्वादाने यशाचे आनंद प्राप्त होतील!-अशोकराव बारब्दे

अकोला ✍ दै.सत्य लढा




मुंबई /अकोला- पत्रकार हक्क, कल्याणासोबतच लोकस्वातंत्र्य चळवळीतून समाजातील गरजवंतांच्या समस्या निर्मुलन,कल्याण आणि भौतिक विकासांच्या गरजांसोबतच आरोग्यसेवेत मानवी सेवा करत राहण्यासारखा दुसरा आनंद नाही. समाजातील माणसांसाठी या पत्रकार चळवळीतून सर्व सहकाऱ्यांसह आपण अव्याहत कार्यरत रहावे.त्यातील प्राप्त आशीर्वादाच्या शक्तीनेच लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ अधिक बळकट होऊन उदात्त कार्याच्या अधिक क्षमता निर्माण करेल.असे प्रतिपादन निवृत्त मंत्रालयीन सचिव व मुंबईतील विदर्भ वैभव मंदिराचे अध्यक्ष अशोकभाऊ बारब्दे यांनी केले. लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ या समाजाभिमुख राष्ट्रीय संघटनेचा कोकण- मुंबई विभागाचा १० वा विचारमंथन मेळावा विदर्भ वैभव मंदिरात नुकताच संपन्न झाला.त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्ष संजय देशमुख यांनी निष्ठा,कर्तव्यभावना आणि संघटनेतील संपर्काचे महत्व ओळखून नुसता मोबाईल वापरून काम करण्याची ईच्छाशक्ती ठेवणे हेच संघटन वाढीचे तंत्र ठरू शकते हे सत्य अधोरेखित केले.सोबतच उपक्रमांनी शासन प्रशासनाकडे वाढलेल्या प्रभावातून मिळत असलेल्या प्रतिसादाची उदाहरणे सादर केली. याप्रसंगी विदर्भ वैभव मंदिराचे सरचिटणीस गजाननजी नागे प्रमुख अतिथी म्हणून तर लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे संस्थापक- राष्ट्रीय अध्यक्ष संजय एम.देशमुख,राष्ट्रीय पदाधिकारी पुष्पराज गावंडे तर महाराष्ट्र संघटन प्रमुख अरविंदराव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सर्वप्रथम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व कर्मयोगी संत गाडगे बाबा यांना वंदन-अभिवादन करण्यात आले.देशातील शहिद जवान,आत्महत्याग्रस्त शेतकरी,अत्याचारग्रस्त महिला बळी,दिवंगत पत्रकार,नैसर्गिक आपत्तीत व अपघातग्रस्त बळींना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली मंत्रालयीन समन्वयक व महाराष्ट्र संघटन प्रमुख रफिक मुलानी,ठाणे जिल्हा संघटनप्रमुख संजय सोळंके,मुंबई महिला आघाडी प्रमुख सौ.सुषमा ठाकूर-ढोले,उमेश चौधरी,राजीव विश्वकर्मा, विदर्भ समाज समाज मिरा- भाईंदर अध्यक्ष संजय जायभाये,माळी,विकास भोसले,राजेन्द्र आंगणे,सी.ए.तुषार तल्हार,सौ.प्रतिक्षा तल्हार, व अनेक पत्रकार या मार्गदर्शन,सन्मान तथा स्नेह मिलन मेळाव्यात उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन व आभार प्रदर्शन सौ.सुषमा ठाकूर- ढोले यांनी केले.

# कायद्यात राहाल तर फायद्यात राहाल : दत्तापूर पोलिसांची वाहतूक कोंडीवर धडक कारवाई

अमरावती ✍ दै.सत्य लढा



धामणगांव रेल्वे धामणगांव रेल्वे शहरात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर ''कायद्यात राहाल तर फायद्यात राहाल'' या ब्रीदवाक्यानुसार दत्तापूर पोलिसांनी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कडक भूमिका घेत धडक कारवाई सुरू केली आहे. शहरातील मुख्य रस्ते, चौक तसेच बाजारपेठ परिसरात बेशिस्तपणे उभ्या केलेल्या वाहनांमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. याची दखल घेत दत्तापूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार गिरीश ताथोड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन गजभारे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाने शहरात व्यापक मोहीम राबवली. या कारवाईदरम्यान नियमबाह्य पार्किंग करणाऱ्या वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. तसेच प्रत्येक दुकानदाराने आपल्या दुकानासमोर ग्राहकांची वाहने शिस्तबद्ध पद्धतीने लावण्याची जबाबदारी घ्यावी, असे स्पष्ट आदेश पोलिसांकडून देण्यात आले. वाहतूक नियमांचे पालन करणे हे केवळ वाहनचालकांचेच नव्हे, तर दुकानदारांचेही कर्तव्य असून सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलिसांनी केले. यासोबतच शाळकरी विद्यार्थ्यांना पालकांनी दुचाकी अथवा चारचाकी वाहने देणे टाळावे, असे आवाहनही दत्तापूर पोलिसांकडून करण्यात आले आहे. अल्पवयीन मुलांकडून वाहन चालविणे हे धोकादायक असून कायद्याचे उल्लंघन ठरते, असे पोलिसांनी स्पष्ट केले. या मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक पुंडलिक चव्हाण, ट्राफिक हवालदार रवी पाखरे, पोलीस कॉन्स्टेबल नारायण फड, हेड कॉन्स्टेबल भाऊराव कांमडी तसेच पोलीस कॉन्स्टेबल राम सोळंके यांचा सक्रिय सहभाग होता. दत्तापूर पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे शहरातील वाहतूक अधिक सुरळीत होत असून, नागरिकांकडून या उपक्रमाचे कौतुक आणि समाधान व्यक्त करण्यात येत आहे. भविष्यातही अशीच कारवाई सातत्याने सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.

# अरुंद रस्ता, बेकायदेशीर लाईट्स; मुक्रामबाद मार्ग नागरिकांसाठी धोक्याचा

नांदेड ✍ दै.सत्य लढा



देगलूर प्रतिनिधी,दि.२०:- मुक्रामबाददेगलूर हा महत्त्वाचा मार्ग आज अक्षरशः मृत्यूचा सापळा बनला आहे. अरुंद रस्ता, ठिकठिकाणी खड्डे, कोणतीही योग्य सूचना व्यवस्था नाही आणि त्यात भर म्हणून रात्रीच्या वेळी धावणारी वाहने लावतात अत्याधुनिक, अति प्रखर व बेकायदेशीर हेडलाईट्स. परिणामी वाहनचालकांचे डोळे दिपतात, क्षणात दृष्टी हरपते आणि अपघात अटळ ठरतो. नुकताच या रस्त्यावर गंभीर अपघाताची घटना घडली असूनही प्रशासन ढिम्म आहे. यापूर्वी नागरिकांनी रस्त्याच्या दुरुस्तीसाठी आंदोलन केले होते, मात्र आंदोलनाचे पडसाद निवळताच सर्व यंत्रणा गप्प बसल्या. आजतागायत कोणतेही गतिशील काम सुरू न होणे म्हणजे नागरिकांच्या जीवाशी खेळच असल्याचा आरोप होत आहे. प्रशासन, नेते आणि राजकारणी सर्वच मौनात नागरिकांचा रोष दिवसेंदिवस वाढत आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी, नेते व राजकारणी केवळ निवडणुकीपुरते रस्त्याचे प्रश्न मांडतात, मात्र प्रत्यक्षात नागरिकांच्या सुरक्षिततेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. जनतेच्या करातून उभ्या असलेल्या यंत्रणा नेमक्या कुणासाठी काम करतात, असा सवाल उपस्थित होत आहे. रात्रीच्या वेळी विशेष पोलीस कारवाईची जोरदार मागणी या मार्गावरून जाणाऱ्या ऑटो,कार खासगी बस,प्रवासी वाहने, ट्रॅव्हल्स, खासगी कार यांच्यावर बसवलेले बेकायदेशीर, बदललेले, अति तेजस्वी हेडलाईट्स तात्काळ काढून टाकून संबंधित वाहनांवर कठोर दंडात्मक कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे. मोटार वाहन कायदा केवळ पुस्तकातच मर्यादित राहणार की प्रत्यक्षात अंमलात येणार, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्या अनुषंगाने रस्त्याचे काम देखील लवकरात लवकर व्हावे अशी अपेक्षा देखील येथील प्रवासी नागरिकाकडून करण्यात येत आहे. मुक्रामबाददेगलूर रस्त्याची तातडीने दुरुस्ती व रुंदीकरण अपघातप्रवण ठिकाणी रिफ्लेक्टर व सूचना फलक ही कामे त्वरित सुरू न केल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांकडून देण्यात आहे. एखादी मोठी दुर्घटना घडल्यास त्याची संपूर्ण नैतिक व प्रशासकीय जबाबदारी संबंधित विभागांवर राहील, असा ठाम इशाराही देण्यात आला आहे.

# दिव्यांग ५% निधी वाटप करण्यात यावे यासाठी विराट मल्टिपर्पज फाउंडेशन च्यावतीने निवेदन

खामगाव ✍ दै.सत्य लढा



खामगाव ग्रामपंचायत स्तरावर अभय योजना अंतर्गत कर वसुली चांगली झाली आहे या मधून दिव्यांग हक्कासाठी असलेला ५% निधी वितरीत करण्यात यावे या करिता विराट मल्टिपर्पज फाउंडेशन खामगाव या दिव्यांग संस्थेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी जि प बुलढाणा गट विकास अधिकारी पंचायत समिती खामगाव जिल्हा बुलडाणा यांना देण्यात आले खामगाव येथे गटविकास अधिकारी चंदनसिंग राजपूत यांनी निवेदन स्वीकारले जिल्हा परिषद पंचायत समिती कार्यक्षेत्रातील ग्राम पंचायत मध्ये दिव्यांग नोंदी उपलब्ध आहे त्यांना शासन ग्रामविकास परिपत्रक नुसार ५% अर्थ सहाय्य प्रदान करण्यात बहुतांश ग्राम पंचायती प्रत्येक वर्षी टाळाटाळ करत असतात नेहमी वसुली न झाल्याचे कारण देत कर्मचारी अधिकारी वेळ मारून नेण्याचा प्रकार करीत असतात त्यांना एक नियमावली आखून देण्यात यावी सध्या शासनाने ५०% कर सवलत साठी अभय योजना नुसार वसुली सुरु आहे त्यात भरघोस प्रतिसाद पाहता ५% दिव्यांग स्वनिधी चे वाटप मागील काळातील थकीत व चालू वर्षचे वाटप येत्या २६ जानेवारी २०२६ गणराज्य दिनाच्या पूर्वसंध्येला किंवा त्याच दिवशी वाटप करण्याचे आदेश देत त्यासाठी आपण जातीने लक्ष घालून हे वितरण करण्यात यावे तसेच २) घरकुल मध्ये सुध्दा प्रथम लाभार्थी म्हणून निवड करण्यात यावी ३) काही ग्राम पंचायत ५०% कर सूट दिव्यांग व त्यांच्या कुटुंबाला सवलत देत नाही ती देण्यात यावी अश्या मागणीच्या निवेदनाची दखल घेत कार्यवाही करण्याचे निवेदन देण्यात आले यावेळी विराट मल्टिपर्पज फाउंडेशन संस्था अध्यक्ष मनोज नगरनाईक प्रहार शहराध्यक्ष शत्रुघ्न इंगळे,मो.राईस,बापू नाना दामोदर,उमेश देशमुख,विलास चतृभुज शेखर तायडे आदी यावेळी उपस्थित होते

# अकोल्यातील 'लाडक्या बहिणी' योजनेंतील समस्या; केवायसीमुळे लाभ थांबले; आ.सावरकरांची शासन दरबारी पाठपुरावा आश्वासन

अकोला ✍ दै.सत्य लढा




अकोला लाडक्या बहिणीचा हक्क मिळून देण्यासाठी आपण शासन दरबारी पाठपुरावा करू आणि लाडक्या बहिणीवर अन्याय होणार नाही ग्रामीण आणि शहरी भागाच्या महिलांना या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी यामधील तांत्रिक बाबी बद्दल सरकार दरबारी प्रश्न उपस्थित करून लाडक्या बहिणींना न्याय मिळवून देऊ असे अभिवचन आमदार रणधीर सावरकर यांनी दिले आज महिला बालकल्याण अधिकारी कार्यालयात लाडक्या बहिणींनी हजारोच्या संख्येने आल्या ही हे माहिती मिळाल्याबरोबर सर्वसामान्यांच्या संवेदना जाणून घेणारे तसेच सतत १८ तास जनतेच्या समस्या निराकरण करण्यासाठी आमदार रणधीर सावरकर यांना तात्काळ महिला बालकल्याण अधिकारी गिरीश पुसतकर यांच्या कार्यालयात आले. त्यांनी जिल्हा महिला बालकल्याण अधिकारी यांच्यासोबत चर्चा करून महिलांचे लाडक्या बहिणीचे पैसे चुकीच्या केवायसी मुळे बंद झाले हे लक्षात आले. लाडक्या बहिणीच्या भावना तसेच अधिकाऱ्यांशी अडचण यासंदर्भात माहिती घेऊन त्यांनी सरकार दरबारी हा प्रश्न मांडण्याचा अभिवचन दिला तसेच केवायसी करताना विचारलेले प्रश्न महिलांना न समजल्यामुळे व तांत्रिक चुकीमुळे केवायसी चुकीची झाल्या ही बाब आमदार सावरकर यांच्या लक्षात आले त्यांनी सर्व महिलांना व सोबत आलेल्या पुरुष मंडळींना आस्वस्थ केले की शासन दरबारी आपला प्रश्न मांडून केवायसी दुरुस्त करण्याचे ऑप्शन सुरू करण्याच्या बाबत शासन दरबारी पाठपुरावा करेल व माझ्या लाडक्या बहिणीचे हक्काचे पैसे मी बंद होऊ देणार नाही त्यांच्यासोबत अंबादास उमाळे विठ्ठल चतरकर राजेश बेले अनिल गावंडे वैभव माहुरे नारायण बोर्डे अंकुश इंगळे राजेश ठाकरे आधी उपस्थित होते

# दर्जेदार व सुरक्षित आरोग्य सेवा देणे प्रशासनाचे सर्वोच्च प्राधान्य-जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

वाशिम ✍ दै.सत्य लढा



वाशिम:-वाशिम जिल्ह्यातील नागरिकांना दर्जेदार, सुरक्षित आणि वेळेत आरोग्य सेवा मिळावी, हे प्रशासनाचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. रुग्णालयांतील पायाभूत सुविधा, सुरक्षा व्यवस्था आणि स्वच्छतेबाबत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी जिल्हा सामान्य रुग्णालय, स्त्री रुग्णालय तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. या भेटीदरम्यान जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेची सद्यस्थिती, उपलब्ध सुविधा आणि सुरू असलेल्या विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या वेळी अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सतीन मेश्राम, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ पी.एस.ठोंबरे, मुख्याधिकारी निलेश गायकवाड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम जोशी, उपकार्यकारी अभियंता अजीम शेख, आकाश कोळकर, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी, विद्युत उपअभियंता स्वरूप सरोदे आदी उपस्थित होते.जिल्हा सामान्य रुग्णालयात जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व विभागांची पाहणी करून रुग्ण व कर्मचारी यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने फायर ऑडिट करून घ्यावे, असे निर्देश दिले. तसेच क्रीटीकल केअर ब्लॉक आणि सेवरेज ट्रीटमेंट प्लॅन्टच्या सुरू असलेल्या बांधकामांची पाहणी करून ही कामे ठरलेल्या कालमर्यादेत पूर्ण करावीत आणि कामांच्या गुणवत्तेवर विशेष लक्ष ठेवावे, असे सांगितले.यानंतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात विविध विभागांची पाहणी करण्यात आली. कुतूहल प्रदर्शनीच्या अनुषंगाने तयारीचा आढावा घेताना जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून नियोजन करावे, असे निर्देश दिले. पोलीस, नगरपालिका, सार्वजनिक बांधकाम, परिवहन, आरोग्य व शिक्षण विभागांनी सुरक्षेपासून स्वच्छतेपर्यंत प्रत्येक बाब काटेकोरपणे अंमलात आणावी, असे त्यांनी नमूद केले.

# श्री.गजानन महाराज यांचे पालखीचे मुर्तीजापुरात स्वागत



मुर्तिजापूर ✍ दै.सत्य लढा

प्रतिनिधी/मूर्तिजापूर तीर्थक्षेत्र मातोळा येथील मोठ्या प्रमाणात भक्तगण शेगाव कडे जात असताना श्री.गजानन महाराज यांचे पालखीचे स्वागत करण्यात आले. आमदार हरीश पिंपळे यांचे पुढाकाराने यांच्या निवासस्थान येथे मोठ्या प्रमाणात भावी भक्तांनी श्री.गजानन महाराज पालखीचे दर्शन घेतले त्याच बरोबर सर्व भाविकांसाठी या ठिकाणी आमदार हरीश पिंपळे यांनी महाप्रसादाचे आयोजन केले होते.विधीपूर्वक पालखी सोहळा सहभागी होऊन पूजा अर्चना करण्यात आली. शहरातील विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात श्री.गजानन महाराज पालखीचे नागरिकांनी दर्शन घेऊन पूजा केली या पालखी सोहळ्यात नूतनताई पिंपळे सुद्धा सहभागी झाले होते. यावेळी भाजपाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते अशी माहिती कोमल तायडे यांनी दिली आहे.

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करावे-ॲड.निलेश हेलोंडे पाटील

वाशिम ✍ दै.सत्य लढा



वाशिम:-मानोरा तालुक्यातील इंझोरी येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांची वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ॲड. निलेश पाटील हेलोंडे यांनी सोमवारी १९ सांत्वनपर भेट घेतली. या कुटुंबांच्या समस्या जाणून घेतल्यानंतर, त्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ तातडीने वेळेवर मिळवून देण्याचे निर्देश त्यांनी उपस्थित प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिले. मानोरा तालुक्यातील इझोरी येथील डिगांबर गजानन इंगळे व शाम तुळशीराम शिंदे या दोन शेतकऱ्यांनी काही वर्षांपूर्वी नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केली होती. या कुटुंबांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी ॲड हेलोंडे यांनी प्रत्यक्ष त्यांच्या घरी जाऊन भेट दिली.यावेळी ॲड हेलोंडे यांनी स्व. शाम शिंदे यांच्या पत्नी संगीता शिंदे, त्यांच्या दोन मुली व मुलगा, तसेच स्व. डिगांबर इंगळे यांच्या पत्नी शितल इंगळे व त्यांच्या मुलांशी सविस्तर चर्चा केली. कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची साधने आणि मुलांच्या शिक्षणाबाबत त्यांनी आस्थेवाईकपणे विचारपूस केली. शेतकरी आत्महत्या ग्रस्थ कुटुंबांना जगण्यासाठी भक्कम आधार मिळावा यासाठी ॲड. हेलोंडे यांनी मुलांच्या शिक्षणासाठी शासनाकडून मिळणारा शैक्षणिक लाभ त्वरित मंजूर करणे. शेतात विहीर आणि पाईपलाईनची सोय उपलब्ध करून देणे. कुटुंबातील महिलांना अर्थार्जनासाठी पशुपालन, शिलाई मशीन मिळवून देणे, दोन्ही कुटुंबांना हक्काचे घरकुल उपलब्ध करून देणे आदी लाभ देण्यासाठी प्रथम प्राधान्य द्यावे असे निर्देश संबंधीत यंत्रणांना दिले.या दौऱ्याप्रसंगी प्रभारी तहसीलदार उमेश बनसोड, गटविकास अधिकारी सुधाकर जाधव, तालुका महिला व बालकल्याण अधिकारी अनुप कदम, तालुका कृषी अधिकारी उमेश राठोड, ग्रामविकास अधिकारी सुरेश चव्हाण उपस्थित होते. तसेच पत्रकार राजू ठाकरे, सरपंच मनीषाताई दिघडे, माजी सरपंच हिम्मत राऊत यांच्यासह विविध विभागांचे कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) भाजपला सत्ता स्थापनेसाठी साथ देणार?

अकोला दै.सत्य लढा




अकोला । प्रतिनिधी अकोला महानगरपालिकेतील निवडणूक निकालानंतर आता राजकीय घडामोडी वेग धरत आहेत. अकोला महापालिकेच्या ८० सदस्यांच्या सभागृहात सत्ता स्थापनेसाठी ४१ नगरसेवकांची गरज असून भाजपकडे ३८ नगरसेवक आहेत, त्यामुळे ३ अतिरिक्त मतांची आवश्यकता भासते. या गणितात आता राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) महत्त्वाची भूमिका बजावण्याची शक्यता वाढली आहे. राज्यात परंपरेने विरोधी पक्षात असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आठवड्याभरांपूर्वी महापालिका निवडणूकीत ३ नगरसेवक विजयी झाले आहेत, ज्यामुळे भाजपला सत्ता मिळवण्यासाठी आवश्यक तिन्ही जागा मिळवता येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. स्थानीय राजकीय वर्तुळातून मिळालेल्या माहितीनुसार, काँग्रेसराष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट यांची आघाडी म्हणून निवडणूक लढवली होती, परंतु आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष काँग्रेसला बाजूला ठेवून भाजपच्या बाजूने जाण्याची चर्चा जोर धरत आहे. या संभाव्य तटबंदीवर शहरात राजकीय वर्तुळांतून विविध चर्चा होत आहेत. (सूत्रांचे संकेत) राजकीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अकोल्यातील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे काही वरिष्ठ पदाधिकारी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना भेटण्यासाठी पुण्यात गेले असल्याचे समोर आले आहे; यावरून सत्ता स्थापनेसाठी संभाव्य राजकीय दावपेच सुरु झाल्याचे संकेत मिळतात. (सूत्रांचे संकेत) राजकीय विश्लेषकांचे मत आहे की, जर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने भाजपला तीन नगरसेवकांची आवश्यक साथ दिली तर भाजप सहज सत्ता स्थापनेच्या जवळ पोहोचू शकते. मात्र, यामुळे राज्यातील पारंपरिक काँग्रेसराष्ट्रवादी युतीबाबतही मोठे राजकीय प्रभाव पडू शकतात. (विश्लेषकांचे मत) या संभाव्य राजकीय समीकरणामुळे महापालिकेतील सत्ता स्थापन प्रक्रीयेला वेगळाच वळण मिळण्याची शक्यता आहे, आणि पुढील काही दिवसांत कोणत्या बाजूने सत्ता स्थापन होते हे स्पष्ट होईल, अशी अपेक्षा आहे.

# ठाकरे गटाचे सहाही नगरसेवक नॉट रिचेबल? देशमुखांनी कॅमेरासमोर केली अफवांची पोलखोल

अकोला दै.सत्य लढा



अकोला । प्रतिनिधी अकोला महानगरपालिकेच्या निवडणूक निकालानंतर शहरातील राजकारण प्रचंड तापले असून, सत्ता स्थापनेसाठी 'हाय व्होल्टेज पॉलिटिक्स' रंगताना दिसत आहे. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे गटाचे सहाही नगरसेवक नॉट रिचेबल असल्याची जोरदार चर्चा अकोल्यात सुरू होती. मात्र, ही चर्चा निव्वळ अफवा असल्याचे आमदार नितीन देशमुख यांनी स्पष्ट करत थेट कॅमेरासमोर सहाही नगरसेवकांना हजर करून सर्व संभ्रम दूर केला आहे. अकोल्यातील ठाकरे गटाच्या पक्ष कार्यालयात आमदार नितीन देशमुख यांच्या उपस्थितीत महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत सर्व सहा नगरसेवक एकत्र उपस्थित असून, आम्ही एकमताने निर्णय घेणार आहोत, असे देशमुख यांनी एबीपी माझाशी बोलताना स्पष्ट केले. त्यामुळे नगरसेवक गायब असल्याच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. अकोला महानगरपालिकेत एकूण ८० जागा असून, कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. भाजप ३८ जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला आहे, तर काँग्रेसने २१ जागा जिंकत दुसरे स्थान पटकावले आहे. उर्वरित जागांवर विविध पक्ष व अपक्ष निवडून आल्याने महापालिकेत त्रिशंकू स्थिती निर्माण झाली आहे. भाजप-काँग्रेसकडून जोरदार राजकीय हालचाली महापालिकेवर सत्ता स्थापन करण्यासाठी भाजप आणि काँग्रेसकडून जोरदार प्रयत्न सुरू आहेत. या सत्तेच्या खेळात प्रत्येक नगरसेवक, तसेच छोट्या पक्षांचे महत्त्व प्रचंड वाढले आहे. भाजपचे मित्रपक्ष असलेल्या शिंदे गटाची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी यांचा प्रत्येकी एक नगरसेवक निवडून आला आहे. तसेच दोन अपक्ष नगरसेवक विजयी झाले असून, त्यातील एक भाजपचा बंडखोर तर दुसरा भाजपसमर्थित असल्याची चर्चा आहे. त्यामुळे भाजपकडून सत्ता स्थापनेबाबत आत्मविश्वास व्यक्त केला जात आहे. किंगमेकर कोण? या संपूर्ण राजकीय समीकरणात वंचित बहुजन आघाडी आणि उद्धव ठाकरे गटाची शिवसेना 'किंगमेकर'ची भूमिका बजावणार असल्याचे चित्र आहे. आमदार नितीन देशमुख यांनी लवकरच आम्ही आमचा निर्णय जाहीर करू, असे संकेत दिल्याने आता सर्वांचे लक्ष ठाकरे गटाच्या भूमिकेकडे लागले आहे. अकोला महापालिकेतील सत्ता कुणाच्या हाती जाणार, याचा फैसला येत्या काही दिवसांत होण्याची शक्यता असून, तोपर्यंत अकोल्यात राजकीय वातावरण अधिकच तापणार, हे निश्चित आहे.

# मातोश्री पानंद व बळीराजा शेत रस्त्यांची कामे प्राधान्याने पूर्ण करावी जिल्हाधिकारी वर्षा मीना

अकोला दै.सत्य लढा




अकोला दि २० : ग्रामीण विकासाला गती देण्यासाठी मग्रारोहयो योजना महत्त्वाची संधी असून विहित वेळेत गुणवत्ता पूर्ण कामे पूर्ण करावी.शेतकऱ्यांना थेट शेतापर्यंत पोहचण्यासाठी मातोश्री पानंद रस्ते व मुख्यमंत्री बळीराजा शेत रस्त्यांची कामे आराखड्यानुसार प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेत जिल्हाधिकारी कार्यालय येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा आढावा घेण्यात आला. यावेळी जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, उपजिल्हाधिकारी (रोहयो) विजय पाटील, उपजिल्हाधिकारी निखिल खेमनार, सार्वजनिक बांधकाम कार्यकारी अभियंता प्रसाद पाटील,जिल्ह्यातील तहसीलदार गटविकास अधिकारी, संबंधित यंत्रणा विभाग प्रमुख आदी उपस्थित होते ग्रामीण भागातील शेतकरी व मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मनरेगा योजनेची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. मजुरांना वेळेत मजुरी कामांची अद्ययावत नोंद,आधार प्रमाणीकरण,इ केवायसी बाबत त्वरित कारवाई करावी. ग्रामीण विकासाला गती देण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करीत योजनांचा लाभ थेट गरजू घटकांपर्यंत पोहोचविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी दिले. श्रीमती मीना म्हणाल्या की, नरेगाच्या माध्यमातून जिल्हा परिषद शाळांच्या आवारभिंती व प्रसाधनगृह बांधकामांची गुणवत्तापूर्ण कामे करावी. तहसीलदार, गटविकास अधिकारी यांनी कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देऊन तपासणी करावी.ग्रामसभेच्या माध्यमातून महत्वपूर्ण कामानबाबत आराखडे तयार करावे जेणेकरून ग्राम विकासाला अधिक चालना मिळेल.

## भाजप नगरसेवक तुरकरांवर जीवघेणा हल्ला; भाजप उमेदवारसह दोन आरोपी अटकेत




अकोला दै.सत्य लढा

अकोल्यात निवडणुक निकालानंतर १६ जानेवारीला अकोटफैल भागात भाजपच्या दोन गटांत राडा झाला होता. यात भाजपचे प्रभाग क्रमांक २ ब मधील नवनिर्वाचित नगरसेवक शरद तुरकरांवर प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. दरम्यान आता हा हल्ला करणाऱ्यांना पडकण्यात आलंय. नगरसेवक शरद तुरकर यांच्यावर प्रभाग क्रमांक २ ड मधील भाजपचे पराभूत उमेदवार नितीन राऊतसह अन्य एकाने हा जीवघेणा हल्ला केला होता. हल्ल्यात शरद तुरकर गंभीर जखमी झाले होते. त्यानंतर तूरकर आणि राऊत यांचे समर्थक आमनेसामने येत मोठी दगडफेक झाली होती. तर अनेक वाहनांची तोडफोड झाली होती. या दरम्यान समर्थकांना पांगवण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागला होता. अखेर पोलिसांनी हल्लेखोर नितीन राऊतसह अन्य एकाला अटक केलीये.

# रेल्वे पोलीसांची कारवाई, आरोपींकडून २८ हजार ३०५ रूपये किंमतीचा गांजा जप्त

अकोला दै.सत्य लढा



दिनांक दि.२०/०१/२०२६ रोजी रेल्वे पोलीस स्टेशन, अकोला प्रभारी अधिकारी सपोनि अर्चना गाढवे यांना गुप्त बातमीदारांमार्फत अकोला रेल्वे स्टेशन परिसरात एक इसम गांजाची वाहतूक करत असल्याबाबत मिळालेल्या माहीतीवरून रेल्वे पोलीसांनी एन.डी.पी. एस. कायदया अंतर्गत कारवाई करत अकोला रेल्वे स्टेशन येथील प्लॅटफॉर्म क. ६ वर बुकिंग परिसरातून आरोपी नामे गणेश बाळू आंभोरे, वय २५ वर्षे, रा. अब्दुल हमीद चौक, संजय नगर, नायगाव, अकोला याच्या ताब्यातून सॅकबॅगमधून खाकी रंगाचे सेलोटेपने चिटकविलेला ०१ बंडल, त्यात ओलसर फुल/बिया/काडीदार हिरवटसर रंगाचा, एकूण १ किलो ८८७ ग्रॅम वजनाचा प्रतिबंधित गांजा किंमत २८ हजार ३०५ रूपये चा मुद्देमाल जप्त केलेला आहे. सदर आरोपीने अंमली पदार्थ स्वतःजवळ बाळगला असताना मिळून आल्याने त्याच्याविरूध्द लोहमार्ग पोलीस स्टेशन, अकोला येथे दाखल गुन्हा करण्यात आला असून सदर गांजा कोठून आणला? कोठे घेवून जाणार होता? याबाबत रेल्वे पोलीस अधिक तपास करत आहेत.

# हुंडीवाले हत्याकांड प्रकरणाचा निकाल आज ॲड. उज्ज्वल निकम यांची विशेष उपस्थिती

अकोला दै.सत्य लढा

अकोला महाराष्ट्र गवळी समाज संघटनेचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष किसनराव हुंडीवाले यांच्या हत्येप्रकरणी सुरु असलेल्या खटल्याचा निकाल बुधवार २१ जानेवारीला दिला जाणार आहे, या खटल्याच्या सुनावणीत महत्वाची भूमिका बजावणारे विशेष सरकारी वकील ॲड. उजवल निकम यावेळी उपस्थित राहणार आहेत. येथील मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजी बी. कचरे यांच्या न्यायालयात ही सुनावणी होणार आहे . या हत्या प्रकरणात एकूण १५ पैकी दीपाली गावंडे, नम्रता गावंडे, प्रवीण गावंडे आणि बार्शिटाकळी येथील मोहमंद शेख साबीर यासेवानिवृत्त पोलिस अधिकारी श्रीराम गावंडे, त्यांचा मुलगा विक्रम गावंडेसह ११ जण या प्रकरणात आरोपी आहेत. ४ आरोपीविषयी न्यायालयात ठोस पुरावे नाहीत. त्यामुळे त्यांना या प्रकरणातून दोषमुक्त करावे, अशी विनंती त्यांनी न्यायालयास केली होती. मात्र श्रीराम गावंडेंसह अन्य ११ आरोपींना शिक्षा व्हावी, अशी मागणी विशेष सरकारी अभियोक्ता उज्ज्वल निकम यांनी केली आहे .

# अकोला जिल्हा च्या वतीने संघटनेचे महाअधिवेशन बाबतीत आढावा बैठक मोठ्या उत्साहात संपन्न

अकोला दै.सत्य लढा




अकोला - महाराष्ट्र राज्य विज तांत्रिक कामगार संघटना १७०१अकोला जिल्हा च्या वतीने आज दि. २०/०१/२०२६ रोजी दुपारी ठीक ३.०० स्थानिक महावितरण रेष्ट हाऊस अकोला येथे आढावा बैठक संपन्न झाली या बैठकीचे अध्यक्ष. माश्री. भाऊसाहेब भाकरे पाटील केन्द्रीय अध्यक्ष हे होते. मुख्य मार्गदर्शक आनबानशान. माश्री. सय्यद जहरोदिन साहेब केन्द्रीय सरचिटणीस हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून. माश्री. कैलास गौरकर. ताराचंद कोल्हे मामा. आप्पासाहेब दाभाडे. हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष माश्री. उपस्थित मान्यवरांचे अकोला झोन च्या वतीने शॉल बुका देऊण अकोला झोन सर्व पदाधिकारी व सदस्य वर्ग यांना केले. सरचिटणीस माश्री. सय्यद जहरोदिन साहेब यांनी माश्री. नाईक साहेब मुख्य अभियंता व. माश्री डोणगावकर साहेब याचे केन्द्रीय पदाधिकारी व अकोला झोन च्या वतीने स्वागत करण्यात आले.. माश्री. सय्यद जहरोदिन साहेब सरचिटणीस यांनी कर्मचाऱ्री यांचे प्रलंबित प्रश्न बाबतीत विशेष चर्चा करण्यात आली संघटनेचे महाअधिवेशन बाबतीत आढावा घेण्यात आला.. माश्री. सय्यद जहरोदिन साहेब यांनी रीटकचरींगबाबती उपस्थित सर्व पदाधिकारी व सदस्य वर्ग यांना सभोदित केले..

या बैठकीत नवनिर्वाचित नागपुर प्रादेशिक सचिव श्री. महेश तपीले यांची निवड झालेली होते त्याचा केन्द्रीय पदाधिकारी यांचा हस्ते सत्कार करण्यात आला या बैठकीचे सुत्रसचालन. सुनिल झेड गवई यांनी केले.. या बैठकीला. अकोला झोन अध्यक्ष जितेंद्र गवई. नागपुर प्रादेशिक सचिव. महेश तपीले. सचिन केतकर. एच टी. वसुसाहेब.. मगेश गवई. रविन्द्र चौखडे. प्रसन्न बोचरे. अमोल चिचोळकार अंनत पालखडे.. अभिषेक देशपांडे. शुभम चिम. प्रियांका भागीरथे. संतोष तेलगोटे. एस. डी. शेगोकार. संजय कापसे. प्रणव देशमुख. सतीश आमले साहेब. निखिल आमले. संजय कपले. प्रतिक चन्द्र गिरी. शुशील रोही. अशोक सपकाळ भुषण सुळे. व बहुसंख्येने पदाधिकारी व सदस्य वर्ग उपस्थित होते. या बैठकीचे आभर प्रदर्शन. अकोला झोन अध्यक्ष जितेंद्र गवई यांनी केले.

# ऑपरेषन प्रहार अंतर्गत बोरगाव मंजु पोलीसांची अवैध जुगारांवर कारवाई

बोरगाव मंजू दै.सत्य लढा



बोरगाव मंजू जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक , अकोला यांचे संकल्पनेतुन सुरू असलेल्या ऑपरेशन प्रहार अंतर्गत बोरगाव मंजु पोलीस स्टेशन हद्दीत बोरगाव मंजू पोलिसांनी ठिकठिकाणी धाडसत्र राबवत जुगारावर सोमवारी कारवाई केली सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार पोलीस स्टेशन हद्दीत अधिकारी व अंमलदार यांचे पथक तयार करून पथकांकडून वेगवेगळया ठिकाणी अवैध जुगारावर लोकांकडुन पैसाची खायवाडी करणा-यांवर अवैधरित्या वरली अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली बोरगाव मंजु येथे अवैधरीत्या जुगार खेळावर लोकांकडुन पैसाची खायवाडी करणारा रविंद्र देविदास मोरे बोरगाव मंजु येथे छापा टाकला असता त्याचे ताब्यातुन नगदी ४६०/- रू , एक पेन, कार्बन तुकडा व आकडे लिहीलेल्या चिठया असा मुददेमाल जप्त करून गुन्हा दाखल केला, ग्राम कुरणखेड येथील कारवाई:- अवैधरीत्या जुगार खेळावर लोकांकडुन पैसाची खायवाडी करणारा षेख रफीक षेख अजिज रा. कुरणखेड ता. जि.अकोला याचेवर ग्राम कुरणखेड येथे रेड कार्यवाही केली असता त्याचे ताब्यातुन नगदी ५२०/-रू , एक पेन, कार्बन तुकडा व आकडे लिहीलेल्या चिठया असा मुददेमाल जप्त करण्यात आला व आरोपी विरूध्द पोलीस स्टेषन बोरगाव मंजु येथे अपराध क्रमांक ४१/२०२६ कलम १२(अ) महा.जुगार अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ग्राम कानषिवणी येथील कारवाई:- अवैधरीत्या जुगार खेळावर लोकांकडुन पैसाची खायवाडी करणारा रवि रमेष दहीगांवकर रा. अन्वी मिर्झापुर ता.जि.अकोला याचेवर ग्राम कानषिवणी येथे रेड कार्यवाही केली असता त्याचे ताब्यातुन नगदी ४००/-रू , एक पेन, कार्बन तुकडा व आकडे लिहीलेल्या चिठया असा मुददेमाल जप्त करून गुन्हा दाखल केला दरम्यान अवैधरीत्या जुगार खेळावर लोकांकडुन पैसाची खायवाडी करत असताना देवेंद्र लक्ष्मण नेमाडे बोरगाव मंजु येथे छापा टाकला असता त्याचे ताब्यातुन नगदी ६५०/- रू , एक पेन, कार्बन तुकडा व आकडे लिहीलेल्या चिठया असा मुददेमाल जप्त करून गुन्हा दाखल केला दरम्यान अन्वी मिर्झापुर येथील अवैधरीत्या जुगार खेळावर लोकांकडुन पैसाची खायवाडी करत असता आनंद छोटेलाल यादव अन्वी अन्वी मिर्झापुर येथे छापा टाकला असता त्याचे ताब्यातुन नगदी ५४०/-रू, एक पेन, कार्बन तुकडा व आकडे लिहीलेल्या चिठया असा मुददेमाल जप्त करून गुन्हा दाखल केला दरम्यान बोरगाव मंजू येथील अवैधरीत्या जुगार खेळावर लोकांकडुन पैसे हारजीतीवर खायवाडी करत असताना रविंद्र देविदास मोरे २. शेख रफीक शेख अजिज रा. कुरणखेड , रवि रमेश दहीगांवकर अन्वी मिर्झापुर , ४. देवेंद्र लक्ष्मण नेमाडे ,५. आनंद छोटेलाल यादव अन्वी मिर्झापुर एकुण पाच जणांना ताब्यात घेत गुन्हा दाखल करुन वेगवेगळया ठिकाणी धाड टाकून नगदी २,५७०/- रू चा मुददेमाल व इतर साहीत्य जप्त करण्यात आले,अवैध धंदे करणा-यांवर ऑपरेषन प्रहार अंतर्गत बोरगाव मंजू पोलिसांनी कारवाई करत गय केली जाणार नाही ही कारवाई

जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बि चंद्रकांत रेडडी, उपविभागीय पोलीस अधिकारी, मुर्तिजापूर श्रीमती वैशाली मुळे यांचे मार्गदर्शनाखाली बोरगाव मंजु पोलीस स्टेशनचे ठाणेदार अनिल गोपाळ , पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर लांडे, रविंद्र धुळे, पोलिस उपनिरीक्षक मनोज उघडे यांच्या सह पोलीस अंमलदार यांनी केली

# अकोल्याच्या राजकारणात मोठा ट्विस्ट; भाजपच्या उमेदवाराला काँग्रेस आणि MIM चा पाठिंबा?

अकोला दै.सत्य लढा




अकोला जिल्ह्यातील हिवरखेड नगरपरिषदेत बाल कल्याण समितीच्या उपसभापती पदासाठी भाजपकडून महिला उमेदवार म्हणून अनिता वाकोडे आहे. त्यांच्या नामनिर्देशित अर्जाच्या सूचकामध्ये काँग्रेसचे नगरसेविका रुबिजा अब्दुल सलमान आहे. तर एमआयएमचे नगरसेवक आजम खान सुभेदार खान यांचं नाव अनुमोदक म्हणून आहे. त्याचे पुरावे देखील समोर आले आहेत .एमआयएमकडून अनुमोदक आणि काँग्रेसकडून सूचकाचं भाजपच्या उपसपाभाती पदाच्या उमेदवारांच्या नामनिर्देशन पत्रात नावे असल्याने मोठी चर्चा याची आहे. अखेर या प्रकारानंतर विरोधकांना मोठं तोंड फुटलं आहे. भाजपच्या उमेदवाराला एमआयएम आणि काँग्रेसच्या नगरसेवकाचा अनोखा पाठिंबा? हिवरखेड नगर परिषदच्या सभापती आणि उपसभापती पदाच्या निवडणुका आज २० जानेवारी रोजी पार पडल्या. यात भाजपच्या उपसभापती पदाच्या उमेदवाराला एमआयएम आणि काँग्रेसच्या नगरसेवकांनी सूचक आणि अनुमोदन दिल्याने आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे. हिवरखेड नगरपरिषदच्या आरोग्य सभापती पदी वदना राजेश वानखडे, बांधकाम सभापती पदी वैभव गावंडे आणि पाणीपुरवठा सभापती पदी अजीज खा जमीर खां, महिला व बालकल्याण सभापती पदी प्रमिला रविंद्र मानकर, नियोजन व विकास समिती पदासाठी प्रमिभा वीरेंद्र येऊल यांची निवड करण्यात आली. मात्र, मिळालेल्या माहितीनुसार महिला व बालकल्याण समिती उपसभापती पदाकरीता भाजपच्या अनिता वाकोडे यांनी अर्ज भरला. परंतु भाजपच्या उमेदवाराला लागणारे सूचक म्हणून काँग्रेसच्या रुबीनाज अब्दुल सलमान यांनी तर अनुमोदक म्हणून एमआयएमचे नगरसेवक आजम खान यांनी सह्या दिल्याने मोठी चर्चा झालीय. त्यामुळं आता महाराष्ट्रात विविध पक्षांच्या युती आणि आघाडी कोण कुणासोबत करेल याचा नेम नाही.

हे पत्र प्रकाशक सतिश भाऊराव देशमुख यांनी मुद्रक राजेंद्र जगन्नाथ देशमुख यांच्या राजेंद्र प्रिंटर्स, बारा ज्योर्तिलिंग मंदिर रोड, रणपिसे नगर, अकोला येथे मुद्रीत करून कार्यालय जवाहर नगर, अकोला ता. जि. अकोला-४४४००१ (महा.) येथून प्रकाशित केले. संपादक - सतिश भाऊराव देशमुख,* कार्यकारी संपादक -अनिल गोपालसा मावळे * पी.आर.बी ॲक्ट नुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर... प्रसारित होणाऱ्या कोणत्याही लिखाणाशी संपादक सहमत असतीलच असे नाही. कोणताही वाद अकोला न्यायालया अंतर्गत